# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 30/01/2023 (सोमवार) सकाळ

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. बेला** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा सोनेगाव आष्टा फाटा येथे दिनांक २९/०१/२०२३ चे ०७.४५ वा. ते ८.४५ वा. दरम्यान आरोपी क्र. नामे— १) प्रद्युम विजय ठाकरे, वय २४ वर्षे, रा. उमरेड कावरापेट जि. नागपुर हा आपले ताब्यातील १२ चक्का टिप्पर क्र. एम. एच.— ४०/सी.डी— ५५९० किंमती अंदाजे १०,००,०००/— रू. गौण खनिज रेती ०६ ब्रॉस किंमती अंदाजे २५,०००/—रू. विनापरवाना आरोपी क्र. ०२ नामे— प्रफुल देशमुख, वय ३२ वर्षे, रा. उमरेड ता. उमरेड जि. नागपुर याचे सांगणेवरून रेतीची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आला. आरोपीतांच्या ताब्यातून वाहनासह असा एकुण १०,२५,०००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— सरकारतर्फे पोलीस नायक अमोल काळे ब. नं. २०१३ पोस्टे बेला यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. बेला येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, १०९ भा.दं.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी ब. नं ६८६ मो. नं. ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील चारगाव रोड शितलवाडी रामटेक येथे दिनांक २९/०१/२०२३ चे ०१.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— हिरामन बुधाजी कुमरे, वय ५७ वर्ष, रा. चारगाव रोड शितलवाडी रामटेक यांच्या राहते घराचा दरवाजा फोडुन आत प्रवेश करून घरातील बेडरुम मध्ये ठेवलेल्या शर्ट व पॅन्ट मधील नगदी ४,०००/—रु. व भिंतीतील आलमारीमध्ये चांदीचे तोरडे ०६ तोळे एकुण किंमती ३,६००/—रु. असा एकुण किंमती अंदाजे ७,४००/— रुपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे मो. क्र. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर